# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२७/११/१७
## दि.२६/११/१७ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ८६८/१७,भादविक ३०७,३२४,३२३,५०४ |
| **फिर्यादी** | नारायण रामगोपाल राजपुत,वय-२८ वर्षे,रा.जय जवान नगर,येरवडा,पुणे |
| **आरोपी** | सलीम इमामसाहब शेख,वय-२३ वर्षे,रा.वारजे-माळवाडी,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/११/२०१७ रोजी १८/०० वा. स.नं.१४,जय जवान नगर,येरवडा,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे रुममध्ये जेवण बनवत असताना,यातील नमुद इसम सलीम शेख याने सदर ठिकाणी येऊन फिर्यादीस 'तु खाना क्यु बना रहा है। हट जा मुझे बनाना है।' असे म्हणाल्याने फिर्यादी यांनी त्यास मुझे खाना बना लेने दो,बादमे तुम बनाना। असे म्हणाल्याचे कारणावरून त्याचा राग मनात धरून,सलीम याने फिर्यादीस हाताने मारहाण करुन रुम मध्ये पडलेला भाजी कापण्याचा चाकु हातात घेऊन,फिर्यादी यांना जीवे मारण्याच्या उद्देशाने त्यांचेवर सपासप वार करुन,फिर्यादी यांचे डोक्यात डावे डोळ्या जवळ, गळ्यावर व नाका जवळ वार करुन जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एस.डी.मारोडे ९६८९३१५०२० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भोसरी पो स्टे ५२३/१७,भादविक ३९२,३२३,३४१,३४ |
| **फिर्यादी** | महेंद्रप्रसाद सिंग,वय-६९,रा.भोसरी,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/११/१७ रोजी २१/०० वा. भोसरी स्मशान भुमी समोरील रोडवर भोसरी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे मोटार सायकलवरून जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांना अडवुन हाताने मारहाण करून,त्यांचेकडील लॅपटॉप ३० हजार रू किचा बॅगेसह जबरदस्तीने हिसकावुन चोरून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. कठोरे ९५२७३५६३४० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे २७७/१७,भादविक ३९४,आर्म अॅक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | अक्षय सुभाष कांबळे,वय-२२,रा.राजीव गांधीनगर,खडकी,पुणे |
| **आरोपी** | सिध्दार्थ बाळु सोनवणे,वय-२२,रा.राजीव गांधीनगर,खडकी,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/११/२०१७ रोजी १३/०० वा.गुरुव्दारा जवळ राजीव गांधीनगर रोडवर खडकी पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांची अॅटो रिक्षामध्ये रस्त्याने पॅसेंजर घेवुन जात असताना,यातील नमुद इसमाने त्याचे हातातील पालघनचा धाक दाखवुन,फिर्यादी यांचे रिक्षाची काच फोडुन त्यांचे खिशात ठेवलेले रोख १,३००/- रुपये जबरदस्तीने काढुन घेत असताना,त्यास फिर्यादी याने माझे पैसे दे असे म्हणाले असता,त्याने त्याचे हातातील पालघन सारख्या हत्याराने फिर्यादी यांचे डोक्यात मारुन जखमी केले. तसेच फिर्यादी यांचा भाऊ रवि सुभाष कांबळे,वय-२० वर्षे हा भांडणे सोडविण्यासाठी आला असता,त्याचे सुध्दा डोक्यात पालघनने मारुन जखमी केले. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. व्ही.एस.आजगेकर |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ११३२/१७,भादविक ४९८(अ),३०६ |
| **फिर्यादी** | जनाबाई गोसावी,वय-२३ वर्ष,रा.मु.पो.वळण,ता.राहुरी,जि.अहमदनगर |
| **आरोपी** | दिपक भानुदास अघाव,रा.हरपळे वस्ती,फुरसुगीं,पुणे (अटक नाही) |

| | |
|---|---|
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे जुन २०१५ रोजीपासुन ते दि.२५/११/२०१७ रोजीपर्यंत हरपळे वस्ती,फुरसुगीं,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची बहीण सौ.सुरेखा दिपक अघाव,वय-२१ वर्षे हिचे लग्न तीचा पती दिपक अघाव या इसमा बरोबर होवुन,ती त्याचेबरोबर सासरी नांदत असताना,त्याने तीस सतत टोचुन बोलुन,तीचा शारिरीक व मानसिक छळ केल्यामुळे ती तणावाखाली राहत असल्याने त्या त्रासाला कंटाळुन,सौ.सुरेखा अघाव हिस तीचा पती याने तीचे राहते घरी गळफास घेवुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. यु.व्हि.पुणे ९४०३१८८३१८ |

**५**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ५६०/१७,भादविक १४३,१४६,१४७,३२३ |
| **फिर्यादी** | प्रथमेश हरिष तिवारी,वय-१६ वर्षे,रा.पिंपळे-सौदागर,पुणे |
| **आरोपी** | सात ते आठ अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/११/१७ रोजी १६/३० ते १७/०० वा.चे दरम्यान ओल्ड स्कुल कॅफे,क्रोमा मॉल जवळ, औंध,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे दोन मित्रांसोबत कॉफी पीत बसले असताना,यातील नमुद सात ते आठ अनोळखी इसमांनी सदर ठिकाणी गैर-कायदयसाची मंडळी जमवुन,त्यांचेमध्ये झालेल्या जुन्या भांडणाचे कारणावरून फिर्यादी यांना लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एन्.एम.पालमपल्ले ९६५७८५६४५० |

**७**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ११३०/१७,भादविक ४२९,सह प्राण्यांना निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध करणारा अधिनियम कलम ११(१), महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ११९ प्रमाणे |
| **फिर्यादी** | पद्मिनी स्टंप,वय-५९ वर्षे,रा.गुरुनानक नगर शंकरशेठ रोड,पुणे |
| **आरोपी** | १.एक महिला,रा.ॲमनोरा पार्क,हडपसर,पुणे २.कपील जयकर (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२४/११/१७ रोजी ॲमनोरा पार्क हडपसर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची मिशन पोसिबल नावाची फिरस्त तसेच पाळीव श्वानांना सांभाळणारी स्वयंसेवी संस्था असुन,फिर्यादी यांनी यातील नमुद इसम व महिला यांना लिया नावाची श्वान दत्तक दिली होती. सदर श्वान हिस सदर इसम व महिला यांनी निर्दयीपणे विषारी औषध देवुन ठार मारले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. लोंढे ८९७५०२०५०० |

## दि.२६/११/१६७ रोजी ००/०० वा. ते २४/०० वा. पर्यंतचा अटक आरोपी तक्ता

| अनं | पोलीस ठाणे | कलम | आरोपीचे नांव | वय |
|---|---|---|---|---|
| १ | खडकी | भादविक ४०६,४०८,४०९,३४ | अभिजीत संजय गोसावी | २१ |
| २ | खडकी | भादविक ४०६,४०८,४०९,३४ | अविनाश अशोक कांबळे | ३४ |
| ३ | खडकी | भादविक ४०६,४०८,४०९,३४ | शिनु राजकुमार सदादलु | ३५ |
| ४ | सिंहगड रोड | भादविक ४१९,४२० | किशोर चुडामण रामटेक्कर | ३५ |
| ५ | येरवडा | भादविक ३५४,३२३,५०४,३४ | राहुल झाबय्या भंडारी | २३ |
| ६ | येरवडा | भादविक ३५४,३२३,५०४,३४ | अजय दौलतसिंग डिकमल | २१ |
| ७ | निगडी | आर्म ॲक्ट ३,५,८ | सागर कुमार इंद्रा | २५ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**